# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990






लातूर वर्ष ४ थे अंक २०० वा रविवार दि.२६ जानेवारी २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## निवडणूक आयोग भाजपच्या इशा-यावर चालतोय

मुंबई : प्रतिनिधी-निवडणूक पारदर्शकपणे घेणे हे निवडणूक आयोगाचे काम आहे मात्र अलीकडच्या काळात निवडणूक आयोग हा मनुवाद्यांच्या आणि भाजपच्या इशा-यावर चालत असल्याचा आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.



२०१९ ते २०२४ या पाच वर्षांत ५ लाख मतदार वाढले. लोकसभा ते विधानसभा या निवडणुकीच्या ६ महिन्यांत ५० लाख मतदार कसे वाढले? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

विधानसभेवेळी ५ वाजल्यानंतर ७६ लाख मतदान कसे झाले? याचे कुठलेही उत्तर निवडणूक आयोगाकडे नाही. भाजपचे कार्यकर्ते असल्यासारखे वागत असल्याने निवडणूक आयोगाची स्वायत्तता नष्ट झाली. निवडणूक आयोगाच्या आशीर्वादावर आलेले हे भाजप सरकार आहे. यामुळे आयोगाच्या कृत्यांविरोधात, लोकशाहीचे रक्षण तसेच मतदारांच्या हक्कासाठी राष्ट्रीय मतदारदिनी काँग्रेसकडून बसस्थानक चौकात विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले.भाजपचे किरीट सोमय्या कुठली चांदणी वा तारा आहे हे कळायला मार्ग नाही. सोमय्या नाटकातील सोंगाड्या असल्याची टीका वडेट्टीवार यांनी केली. आवश्यक त्या ठिकाणी त्याला पुढे केले जाते. काम झाले की त्यांचे कपडे काढून टाकले जातात. त्यामुळे त्यांना महत्त्व देण्याची गरज नाही असे वडेट्टीवार म्हणाले. ज्यांच्यावर सोमय्यांनी आरोप केले ते सगळे मंत्रिमंडळात मंत्री असून सरकारमध्ये सहभागी आहेत. त्यांनी आरोप करायचे आणि भाजपने त्यांना उचलून घ्यायचे अशा बेइमान लोकांना महत्त्व देण्याची गरज नाही.

हिंदूंना मूर्ख बनवून व्होट घ्यायचेज्या दिवशी भाजप हिंदू-मुस्लिम आणि मंदिर आणि मशीद यांचे राजकारण बंद करेल त्या दिवशी भाजपचे अध:पतन झाले असेल. भाजप केवळ मतांसाठी हिंदू- मुस्लिम, मंदिर-मशीद, भारत-पाकिस्तान, व्होट जिहाद करीत आहे. हिंदूंना मूर्ख बनवून व्होट घ्यायचे हा एकमेव धंदा भाजपचा आहे. मुख्यमंत्री दावोसला जाऊन आलेत मात्र झालेले करार हे महाराष्ट्रातीलच कंपन्यांसोबत आहेत. महाराष्ट्रातील चांगले उद्योग गुजरातला जात आहेत त्यावेळेस हे गप्प का बसत आहेत असे वडेट्टीवार म्हणाले.

लढ म्हटले की आम्ही लढायला तयार

काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष विषयावर बोलताना हा प्रश्न हाय कमांडचा असल्याचे वडेट्टीवार म्हणाले. प्रदेशाध्यक्ष कधी द्यायचा? कोण करायचे? हे हायकमांड ठरवीत असते. याचे उत्तर माझ्याकडे नाही. प्रदेशाध्यक्षासाठी आपण इच्छुक आहात का? यावर बोलताना हाय कमांड निर्णय घेईल त्यांनी लढ म्हटले की आम्ही लढायला तयार असल्याचे वडेट्टीवार म्हणाले.

## नोबल इंग्लिश प्री. प्रायमरी शाळेचा वार्षिक खेळ स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न...






लातूर / प्रतिनिधी :-२६ जानेवारी निमित्ताने लातूर शहरातील बरकत नगर येथील नोबेल इंगलीश प्री. प्रायमरी शाळेत वार्षिक खेळ स्पर्धा मोठया उत्साहात पार पडली. मुलांच्या कला गुणांना वाव मिळावा आणि लहान पनापासूनच मुलांना वेगवेगळ्या खेळाबद्दल माहिती मिळावी या उद्देशाने शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. उम्मेहानी शेख, सचिव मुददसिर शेख, आणि अध्यक्ष फारूक शेख यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा वेगवेगळे कराटेचे फॉम पंच आणि काही वेगवेगळ्या प्रकारचे खेळ कॉम्पिटिशन घेण्यात आले. या वर्षीक स्पर्धा कार्यक्रमात मुख्य अतिथी म्हणून माजी नगरसेवक इम्रान सय्यद, सचिन बंडापल्ले, प्रा. युसूफ फारुकी, प्रा. अनिल सूर्यवंशी, एन टीव्ही न्युज वृत्तवाहिनीचे लातूर जिल्हा प्रतिनिधी मोमीन हारून, महाराष्ट्र जीवन न्युज चॅनलचे मुख्य संपादक खय्युम शेख, डॉ. ताहेर शेख, सामाजिक कार्यकर्ते जावेद शेख यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. पत्रकार मोमीन हारून आणि डॉ ताहेर शेख यांनी पालकांच्या वतीने पंचाची भूमिका निभावली आणि विजयी विद्यार्थ्यांना सुवर्ण पदक, रौप्य पदक, कांस्य पदक देऊन सन्मानित करण्यात आले. मुख्य अतिथीनी आपल्या भाषणात शाळेच्या व्यवस्थापन, विद्यार्थ्यांचा विकास आणि विद्यार्थ्यांसाठी जे प्लॅटफॉर्म उपलब्ध करून दिले याबद्दल शाळेच्या व्यवस्थापनेचे कौतुक केले.

शाळेचे सचिव मुददसिर शेख यांनी आपल्या भाषणात खेळाचे महत्व सांगत आपल्या शाळेच्या शिक्षण वर्गाचे केलेल्या मेहनतीचे कौतुक केले. सदरील कार्यक्रमाला विद्यार्थ्यांच्या पालकांनी मोठया प्रमाणात हजेरी लावून विद्यार्थ्यांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी मदत केली आणि स्पर्धेचा आनंदही लुटला.

## एसटीची भाडेवाढ त्वरित मागे घ्या धिरज देशमुख यांची मागणी

लातूर/प्रतिनिधी :-महाराष्ट्राची जीवनवाहिनी असलेल्या एसटी बसच्या तिकीट दरात एकाचवेळी थेट १५ टक्के वाढ करण्याचा निर्णय सर्वसामान्यांसाठी, शेतकऱ्यांसाठी, ग्रामीण भागातील नागरिकांसाठी अत्यंत जाचक आहे. राज्य सरकारने पुनर्विचार करून राज्यातील जनतेवर लादलेला निर्णय तातडीने मागे घ्यावा. अशी मागणी लातूर ग्रामीणचे माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी केली.



एसटीच्या तिकीटांची भाडेवाढ राज्यात आजपासून लागू झाली आहे. त्यामुळे शहरातील आणि खेडोपाड्यातील सर्वसामान्य नागरिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. याची दखल घेत लातूर ग्रामीणचे माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार उपमुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे यांना पत्र पाठवत एसटीची भाडेवाढ मागे घेण्याची मागणी केली आहे. राज्याच्या प्रमुखांना (मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री) विचारात न घेता, मंत्रीमंडळाच्या बैठकीत चर्चा न करता सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लावणारा जाचक निर्णय परिवहन विभागाने घेतला आहे. वाढलेली महागाई, शेतमालाचे पडलेले भाव यामुळे सर्वसामान्य माणूस आधीच त्रासलेला आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र सुरूच आहेत. तरुणांच्या हाताला काम नाही. याचा विचार न करता एसटी भाडेवाढीचा निर्णय घेण्यात आला आहे. असे धिरज विलासराव देशमुख यांनी सांगितले.घोषणेचा पडला विसरविधानसभा निवडणुकांच्या आधी एसटीची भाडेवाढ करण्यात येणार होती. त्यावेळी 'आम्ही एसटीच्या तिकीट दरात कसलीही वाढ करणार नाही' अशी घोषणा महायुती सरकारने केली होती. निवडून आल्यानंतर, प्रचंड बहुमत मिळाल्यानंतर सरकारला आपल्या घोषणेचा विसर पडलेला दिसत आहे. अशी नाराजी धिरज विलासराव देशमुख यांनी व्यक्त केली.


## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई यांचा सत्कार



लातूर :-श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई यांना भारतीय दलित पँथरच्यावतीने दिला जाणारा पहिला राज्यस्तरीय शीलरत्न पुरस्कार २०२४ जाहीर झाला आहे. त्यानिमित्ताने त्यांचा श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला, यावेळी संस्थेचे संचालक राजेश्वर बुके, संचालक प्रा. जी. एम. धाराशिवे, प्रमुख वक्ते भारत सातपुते, मुख्य समन्वयक डॉ. भाकररेड्डी नल्ला, उपप्राचार्य प्रा. संजय पवार आणि डॉ. रत्नाकर बेडगे यांची प्रमुख उपस्थिती होती. भारतीय दलित पँथरचे संस्थापक अध्यक्ष अंबादास शिंदे व छत्रपती शिवरायांचे तेरावे वंशज तथा महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष फत्तेसिंह राजे भोसले यांनी या पुरस्काराची घोषणा नुकतीच केली आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा प्रजासत्ताक दिनी रविवार दि. २६ जानेवारी २०२५ रोजी दु. ३.३० वाजता श्रावस्ती बुद्ध विहार, विक्रम नगर, लातूर येथे दिला जाणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड हे उपस्थित राहणार असून दलित पँथरचे राज्य उपाध्यक्ष डी. एस. नरसिंगे, बीड जिल्हाध्यक्ष वैजनाथ गायकवाड, ॲड. लक्ष्मण शिंदे (बीड) प्रा. एस. आर. हावळे, प्रा. बापू गायकवाड आणि विलास घारगावकर यांच्या उपस्थितीमध्ये सन्मानचिन्ह, मानपत्र आणि शाल असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. देशातील पिढीतांवरील अन्यायाचा प्रतिकार आदर्श प्रतिकार करण्यासाठी महाराष्ट्रातील बहुजन समाजातील सुमारे ६०० पेक्षा अधिक ज्येष्ठ पँथरनी दि. ३ ऑगस्ट २०२३ रोजी भारतीय दलित पँथरचे पुनर्जीवन केले असून सध्या महाराष्ट्रात तिचे कार्य चालू आहे यामध्ये समाजातील चारित्र्यवान, नीतिमान आणि विशेषत: शील संपन्न व्यक्तीला समाजासमोर आदर्श रूपाने उभे करण्यासाठी त्यांना शील रत्न राज्यस्तरीय पुरस्कार देण्याचा विचार पुढे आला आणि या पहिल्याच राज्यस्तरीय शील रत्न पुरस्कार २०२४ साठी महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय दुर्वासराव गवई यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. प्राचार्य डॉ. संजय गवई हे जून २००० पासून महाविद्यालयाच्या समाजकार्य विभागामध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत असून नुकतीच श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सन्माननीय संस्था पदाधिकारी यांनी त्यांना दि. ०६ जुलै २०२३ रोजी प्रभारी प्राचार्य पदाची जबाबदारी दिली आणि ती जबाबदारी छत्रपती शिवराय, फुले, शाहू, आंबेडकर आणि जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या विचाराशी एकनिष्ठ राहून बौद्ध धम्म जीवनात सर्वश्रेष्ठ मानून शील सदाचाराचे आचरण करून महाविद्यालयाला एक वेगळ्या उंचीवर नेण्याचे कार्य त्यांनी केलेले आहे असे गौरव उद्गार यावेळी संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे यांनी व्यक्त केले. या पुरस्काराबद्दल सत्कार बद्दल प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सर्व संस्था पदाधिकारी, मुख्य समन्वयक, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, कार्यालय प्रमुख, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे मनापासून आभार व्यक्त केले.

## चांदापुर येथे २ फेब्रुवारी रोजी ११ व्या धम्म परिषदेचे आयोजन

### धम्म उपासकांनी सहभागी व्हावे - तक्षशिला बौद्ध धम्म प्रशिक्षण प्रतिष्ठाण यांचे आवाहन



पु. डॉ. भदन्त उपगुप्त महाथेरो,पुर्णा (कार्याध्यक्ष, अ.भा.भिक्खू संघ) | भिक्खू डॉ. लि.ची.रान (माजी कुलगुरु, कोरियन बुध्दिस्ट विद्यापीठ दक्षिण कोरिया) | भिक्खू थेर इम चांग व्वू (मुख्य संस्थापक, बुलवांगडोंगजोल विहार, दक्षिण कोरिया) | पु. भिक्खु महावीरो थेरो, काळेगाव | पु. भिक्खु धम्मशील थेरो, हिंगोली/बीड | पु.भिक्खू पय्यावर्धन, हिंगोली

अंबाजोगाई /प्रतिनिधी :- परळी तालुक्यातील वसंतनगर तांडा, मौजे चांदापुर (तिर्थक्षेत्र दर्जा - क प्राप्त) येथे प्रतिवर्षी प्रमाणे यावर्षी ही रविवार, दिनांक २ फेब्रुवारी २०२५ रोजी अकराव्या बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या धम्म परिषदेला अखिल भारतीय भिक्खू महासंघाचे कार्याध्यक्ष पुज्य भदन्त डॉ.उपगुप्त महाथेरो (पुर्णा) यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या धम्म परिषदेचे उद्घाटक म्हणून पुज्य भिक्खू थेर इम चांग व्वू (मुख्य संस्थापक, बुलम्वांगडोंगजोल विहार, दक्षिण कोरिया) तर विशेष अतिथी म्हणून पुज्य भिक्खू डॉ.लि.ची.रान (माजी कुलगुरू, कोरियन बुध्दीस्ट विद्यापीठ, दक्षिण कोरिया), पुज्य भिक्खू महाविरो थेरो (काळेगाव अहमदपुर), पुज्य भिक्खू धम्मशील थेरो ( शिवणी, बीड) आणि पुज्य भिक्खू पय्यावर्धन (हिंगोली) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभुषण पुरस्कार प्राप्त स्मृतीशेष शंकरराव जगतकर नगरी, चांदापुर (परळी वै.) येथे ही धम्म परिषद आयोजित करण्यात आली आहे. या धम्म परिषदेचे 'सम्यक संकल्प' या पेजवरून फेसबुक लाईव्ह थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे. याचा लाभ धम्म उपासकांनी घ्यावा असे आवाहन धम्म परिषदेचे अध्यक्ष ॲड.अनंतराव जगतकर यांनी केले आहे. तक्षशिला बौद्ध धम्म प्रशिक्षण प्रतिष्ठाण, चांदापूर, जेतवन (ता.परळी, जि.बीड) यांच्या वतीने तालुक्यातील चोखामेळा सहकारी सोसायटी, वसंतनगर तांडा, मौजे चांदापूर, ता.परळी येथे रविवार, दिनांक २ फेब्रुवारी २०२५ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त स्मृतीशेष शंकरराव जगतकर नगरी येथे अकराव्या बौद्ध धम्म परिषदेची सुरूवात सकाळी ९ वाजता पंचरंगी धम्म ध्वजारोहणाने होईल.

या धम्म परीषदेच्या अध्यक्षस्थानी डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रबोधिनीचे अध्यक्ष ॲड.अनंतराव जगतकर हे असणार आहेत. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार संजय दौंड, माजी लेफ्टनंट कर्नल डॉ.एम.एच.कांबळे तर यावेळी नालंदा अकादमीचे अध्यक्ष चंद्रशेखर वडमारे, सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले, कृषी तज्ज्ञ डॉ.मधुकर खळगे, समाजभूषण आनंद वाघमारे, बौद्धाचार्य आनंद तुपसमुद्रे, मिलिंद नरबागे, श्रावण बनसोडे, महादेव बनसोडे, प्रशांत गित्ते (ग्रा.पं.सदस्य,चांदापूर.), उपमुख्याध्यापक विलास गायकवाड, संग्राम गीते (सरपंच चांदापुर) गोल्ड मेडल प्राप्त वंदना राहुल सुरवसे, बौद्धाचार्य सचिन रणखांबे तसेच प्रसिद्धीप्रमुख प्रा.बालाजी जगतकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे, ज्या उपासकांना धम्म परीषदेला उपस्थित रहावयाचे आहे. त्या धम्म उपासकांनी पांढरे वस्त्र परिधान करूनच धम्म परिषदेत सहभागी व्हावे तसेच वसंतनगर तांडा, चांदापूर (ता.परळी वैजेनाथ) या ठिकाणी धम्म परिषदेस येताना पुस - नंदागौळ - वसंतनगर तांडा मार्गेच यावे. असे आवाहन संयोजन समितीने केले आहे. धम्म परिषदेच्या यशस्वितेसाठी तक्षशिला बौद्ध धम्म प्रशिक्षण प्रतिष्ठाण चांदापूर, जेतवन (ता.परळी वै. जि.बीड) चे पदाधिकारी चंद्रकांत इंगळे, प्रा.प्रदीप रोडे, राजेंद्र घोडके, राहुल घोडके, प्रा.गौतम गायकवाड, व्यंकट वाघमारे, सचिन वाघमारे, जगन सरवदे, विश्वनाथ भालेराव, सीमाताई इंगळे चंद्रकांत बनसोडे शाहीर गौतम सरवदे, सुरेश कांबळे किशोर इंगळे आकाश वेडे सुशिल इंगळे सर नागेश जोंधळे राहुल सुरवसे बी एस बनसोडे हे प्रयत्न करीत आहेत. तर चांदापुर येथे ११ व्या बौध्द धम्म परीषदे निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या सर्व कार्यक्रमास या विभागातील उपासकांनी मोठ्या संख्येने सहभागी असे आवाहान करण्यात आले आहे

## आमदार केराम यांनी विभाग प्रमुखांचा घेतला आढावा

किनवट: शेख शौकत :-किनवट तालुक्यातील वेगवेगळ्या विभागाच्या कामांचा आमदार भीमराव केराम यांनी सर्व विभाग प्रमुखांचा आढावा घेतला. ही आढावा बैठक तहसील कार्यालयाच्या सभागृहात मंगळवारी दुपारी पार पडली. या बैठकीला सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी मेघना कावली, तहसीलदार डॉ. शारदा चोंडेकर, माहुरचे तहसीलदार किशोर यादव यांची उपस्थिती होती. सार्वजनिक बांधकाम, पाटबंधारे, वनविभाग, मृद संधारण, जल सिंचन, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग आदी विभागाच्या एचओडीची बैठक घेण्यात आली. नैसर्गिक आपत्ती व आगामी काळात तालुक्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये यासाठी खबरदारी घेण्याच्या सूचना आमदार भीमराव केराम यांनी सर्व संबंधितांना दिल्या. ज्या कांही योजना आहेत त्या निधी अभावी थांबल्या असतील तर सांगा निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहील अशी ग्वाही त्यांनी दिली.

जल जीवनची कामे पूर्ण करण्याची दिल्या सूचना :पाईपलाईन टाकली नाही जल जीवन मिशन अंतर्गत कामे सुरू आहेत. कुठे टाक्याचे बांधकाम झाले पण पाईपलाईन टाकली नाही. कुठे पाईप टाकले पण टाक्या बांधल्या नाहीत. कांही ठिकाणी दोन्ही कामे झाली पण पाणी कुठून आणावे? तेच प्रश्न सोडला नाही.

## संपादकीय....

# लोकशाहीचे नवे पर्व

भारताची राज्यघटना २६ जानेवारी १९५० रोजी अमलात येऊन देशात लोकशाहीचे नवे पर्व सुरू झाले. प्रजासत्ताक अस्तित्वात येण्याच्या एक दिवस अगोदरच म्हणजे २५ जानेवारीस निवडणूक आयोगाची स्थापना झाली आणि निवडणुका होऊ लागल्या. सारनाथ येथील अशोकस्तंभावरील तीन सिंहांचा उर्ध्वभाग, त्याच्या खालील धम्मचक्र, उजवीकडील वृषभ आणि डावीकडील घोडा हे घटक व त्याखालील उपनिषदातील 'सत्यमेव जयते' हा शब्दसमुच्चय अशी योजना केलेल्या त्रिमूर्तीचा भारताचे राष्ट्रीय बोधचिन्ह म्हणून २६ जानेवारी १९५० रोजी स्वीकार केला गेला, तर २४ जानेवारी १९५० रोजी 'जनगणमन' हे राष्ट्रगीत म्हणून स्वीकारले आणि त्यासोबतच 'वंदे मातरम'ला राष्ट्रगान म्हणून मान्यता दिली गेली. आता प्रजासत्ताकाचे हे अमृतमहोत्सवी वर्ष सुरू होत असून, भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनवण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न आहे. ते पूर्ण करण्यासाठी नीती आयोगाने एक रणनीती आखली आहे. यासाठी आयोग विविध शहरांची अर्थव्यवस्था सुधारण्याच्या दृष्टीने मोहीम राबवणार आहे. सुरुवातीला मुंबई, सुरत, वाराणसी आणि विशाखापट्टणमच्या आर्थिक परिवर्तनासाठी तयार केलेल्या योजनेवर काम केले जाईल. त्यानंतर प्रमुख २० ते २५ शहरांच्या सुधारणेचे काम हाती घेतले जाईल. पूर्वी हा आयोग केवळ शहरांसाठी नगरनियोजन करत असे. आता शहरांसाठी आर्थिक योजना तयार करून ती वेगाने साकारण्यासाठी त्यावर काम सुरू झाले आहे. २०४७ पर्यंत भारताची अर्थव्यवस्था ३० ट्रिलियन डॉलरची बनवण्यासाठी नीती आयोगाने 'व्हिजन डॉक्युमेंट' तयार केले आहे. त्यासाठी आयोगाकडे तरुणांकडून सूचना प्राप्त झाल्या आहेत.

'एआय' वापरून आयोग त्यावर काम करत असून, ही सर्व प्रक्रिया विद्यापीठे व अन्य शिक्षण संस्थांच्या मदतीने पूर्ण करण्यात आली आहे. बृहन्मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पनवेलसह नऊ महापालिकांचे मिळून जे 'एमएमआर' क्षेत्र बनले आहे, त्याचा जीडीपी ३०० अब्ज डॉलरपर्यंत नेण्याचे लक्ष्य आहे. मागील १० वर्षांत भारताने झपाट्याने घोडदौड करून दाखवली आहे. ग्रामीण भागात प्रधानमंत्री आवास योजनेद्वारे ३ कोटी घरे बांधली जाणार असून, पुढील ५ वर्षांत आणखी दोन कोटी घरे बांधण्याचे उद्दिष्ट आहे. विकसित भारताच्या व्हिजनला चालना देत ५० वर्षांपेक्षा अधिक काळ व्याजमुक्त कर्जाच्या स्वरूपात १.३० लाख कोटी रुपयांचे भरीव वाटप राज्यांना केले जाणार आहे. प्राप्तिकर परतावा प्रक्रियेच्या कार्यक्षमतेत लक्षणीय सुधारणा करण्यात आल्या आहेत. या प्रक्रियेस पूर्वी सरासरी ९३ दिवस लागत. आता केवळ १० दिवस लागतात. त्यामुळे करोडो प्राप्तिकरदाते समाधानी आहेत. एक कोटी कुटुंबांना घरावर सौरऊर्जा संच लावण्यासाठी सक्षम करण्याचे उद्दिष्टही असून, या योजनेतून दरमहा ३०० युनिटपर्यंत मोफत वीज मिळेल. माल वाहतुकीतील खर्च कमी करून कार्यक्षमता वाढवण्यासाठी 'पीएम गतिशक्ती'अंतर्गत तीन प्रमुख रेल्वे कॉरिडॉर कार्यक्रम राबवण्याची योजना आहे. माल तयार होऊन तो गोदामात धाडणे व तेथून गरजेनुसार विमानतळ किंवा बंदरापर्यंत पोहोचवणे यासाठी लागणारा वेळ व खर्च याद्वारे कमी होईल. ४० हजार रेल्वे डब्यांना 'वंदे भारत' मानकांमध्ये रूपांतरित करण्यात येणार आहे.

देशात नागरी विमान वाहतुकीस चालना मिळावी आणि सर्वसामान्यांच्या आवाक्यात विमान प्रवास यावा, यासाठी केंद्र सरकारने उडान योजना सुरू केली. आणखी १०-२० वर्षांत या देशातील सामान्य माणूसही विमानाने फिरू शकणार आहे. म्हणूनच दुर्गम भागांत वा छोट्या शहरांतही विमानतळ बांधले जात आहेत. सागरमाला प्रकल्पांतर्गत जागतिक जहाजांच्या पुनर्बांधणी व्यवसायापैकी ६० टक्के व्यवसाय देशातच सुरू व्हावा, हे ध्येय आहे. यासाठी सरकारने 'रिसायकलिंग ऑफ शिप्स' हा कायदा केला असून, याद्वारे देशात एक कोटी नवे रोजगार निर्माण होणार आहेत. विकसित भारत २०४७ साठी 'लवचिक ग्रामीण भारता'ची उभारणी ही संकल्पना समोर ठेवून, दिल्लीत 'ग्रामीण भारत महोत्सव' नुकताच भरवण्यात आला. ग्रामीण भागात शहरी दर्जाच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे. महात्मा गांधी यांनी भारत खेड्यात राहतो आणि शेवटच्या व्यक्तीस दारिद्र्यमुक्त करणे हे ध्येय आहे, असे म्हटले होते. सरकारने स्वच्छ भारत मिशनअंतर्गत प्रत्येक घरात शौचालय बांधून दिले. पक्की घरे देऊन जलजीवन मिशनअंतर्गत करोडो घरांना सुरक्षित आणि स्वच्छ पाण्याचा पुरवठा केला जात आहे.

ई-संजीवन टेलिमेडिसिन उपक्रमाद्वारे गावांमधील लोकांना सर्वोत्तम डॉक्टर आणि रुग्णालयांची सेवा दिली जात आहे. देशातील ९००० शेतकरी उत्पादक संघटनांना अर्थसाह्य दिले जात आहे. ग्रामस्थांना मालमत्तांची कागदपत्रे वितरित करण्यासाठी 'स्वामित्व योजना' सरकारने हाती घेतली आहे. मुद्रा, स्टार्टअप इंडियासारख्या योजनांमुळे तरुणांना पाठबळ मिळत आहे. शेतीशिवाय लोहारकाम, सुतारकाम, कुंभारकाम यासारखी पारंपरिक कला-कौशल्याची कामे गावखेड्यांमध्ये केली जातात. त्यांच्या कौशल्यवर्धनासाठी विश्वकर्मा योजना राबवली जाते. ग्रामीण भागातील बहुसंख्य दलित, आदिवासी, ओबीसी यांचे जीवन सुसह्य झाल्यास त्यांना शहरात येण्याची गरजच उरणार नाही. थोडक्यात, समृद्ध आणि विकसित भारत साकारण्यासाठी कल्पक योजना व उपक्रम राबवले जात आहेत; पण या कामाला राज्यांचे सहकार्य मिळणे तितकेच गरजेचे आहे. केवळ विरोधी पक्षांचे सरकार राज्यात आहे, तेथे केंद्रीय योजना राबवल्या जात नाहीत, असे नाही, तर काही भाजपशासित राज्येही योजना प्रभावीपणे राबवत नसल्याचे वास्तव आहे. इस्रायल, जपान, दक्षिण कोरिया, व्हिएतनाम, थायलंड यासारख्या देशांनी प्रतिकूल परिस्थितीतून जिद्दीने व गतिमानतेने प्रगती साधली. त्यासाठी सर्व काही सरकारने करावे, या वृत्तीचा त्याग केला पाहिजे. सामाजिक शिस्त, सचोटी, कार्यक्षमता हा आमच्या संस्कृतीचा भाग बनला पाहिजे.

# प्रजासत्ताक दिन म्हणजेच स्वतंत्र भारताची नियमावली.




२६ जानेवारी संविधानाचा व नियमांचा आधारस्तंभ आहे.१५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.परंतु स्वातंत्र्यानंतर संविधान, देशाची नियमावली असने गरजेचे असते.कारण कोणत्याही कार्याकरीता पुढे पाऊल टाकण्यास कायद्याच बंधन असने गरजेचे आहे.२६ जानेवारी १९५० रोजी देशाची राज्यघटना लागु झाली.त्यानिमित्याने भारतातील प्रत्येक नागरिक मोठ्या उत्साहाने प्रजासत्ताक दिन साजरा करीत असतो.कारण प्रजासत्ताक म्हणजे लोकांव्दारे लोकांसाठी शासन. भारतात जात,धर्म,पंथ,वंश,गरीब-श्रीमंत, व्देष या संपूर्ण गोष्टी बाजूला ठेवून गुन्या-गोविंदाने प्रजासत्ताक दिवस वेगवेगळ्या संस्कृतीच्या माध्यमातून मोठ्या उत्साहाने साजरा करतात. २६ जानेवारी १९५० रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांची लॉर्ड माउंट बॅटन(गव्हर्नर जनरल) यांच्या जागी भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून निवड झाली.२६ जानेवारीच्या निमित्ताने दरवर्षी राष्ट्रपतींच्या हस्ते दिल्लीतील राजपथावर राष्ट्रध्वज फडकवला जातो.आपण ७५ वा प्रजासत्ताक दिन साजरा करीत आहोत.मुख्यत्वे करून २६ जानेवारीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली राज्यघटना लागु करण्यात आली. त्यामुळे स्वतंत्र भारतासाठी हा मोठा आणि गौरवाचा दिवस मानल्या जातो.भारताला स्वतंत्र होऊन ७८ वर्षे झाली असली तरी आजही देशात आपल्याला गुन्हेगारी, भ्रष्टाचार, बँक घोटाळे,झुंड बळी, जातीयवाद, हिंसाचार,यांच्याशी आजही आपण लढतोय ही स्वतंत्र भारतासाठी शोकांतिकाच म्हणावी लागेल.अशा गुन्ह्या विरूद्ध सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी एकत्र येण्याची नितांत गरज आहे. कारण देश स्वतंत्र करण्यासाठी महात्मा गांधी,भगतसिंग, राजगुरू, सुभाषचंद्र बोस, झाशीची राणी, लाला लजपतराय, लोकमान्य टिळक, चंद्रशेखर आझाद, हजारो क्रांतिकारक, मवाळवादी -जहालवादी, थोर महात्मे इत्यादीसह लाखो स्वतंत्र शुरविरांनी आपल्या प्राणांची आहुती दिली.तेव्हाच १५ ऑगस्ट १९४७ हा दिवस उदयास आला.भारताच्या थोर महात्म्यांना भारत स्वतंत्र करण्यासाठी दोन नद्यांचा सहारा घ्यावा लागला व त्या दोन नद्यांचा उगम झाला एक मवाळवादी तर दुसरी जहालवालवादी यांच्या संगमानेच भारतीय स्वातंत्र्यलढा उभा झाला. याकरिता आपल्याला १५ ऑगस्ट१९४७ उजाडण्यासाठी तब्बल १५० वर्षे वाट पाहावी लागली.१५० वर्षांच्या काळातील स्वतंत्र विरांचे बलीदान व्यर्थ जावु नये व त्यांचा सन्मान व्हावा या उद्देशाने २६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटना अस्तित्वात आणली.यात मुख्यत्वेकरून डॉ बाबासाहेब आंबेडकर, डॉ राजेंद्र प्रसाद, सरदार वल्लभभाई पटेल,पंडित जवाहरलाल नेहरूसह अनेक थोर महात्म्यांचा सिंहाचा वाटा आहे.परंतु दु:खाची गोष्ट म्हणजे गेल्या ३० वर्षांपासून देशात भ्रष्टाचार, करोडोचे घोटाळे, बलात्कार, गुन्हेगारी,निवडणुकांमध्ये जातीयवाद याला मोठ्या प्रमाणात उत आल्याचे पहायला मिळते.ही शहिद विरांच्याप्रती अत्यंत दु:खद व चिंताजनक बाब आहे. आपल्या पुर्वजांनी व देशाच्या स्वतंत्र संग्राम सेनानींनी आणि बहादुर विरांनी घर-दार, परीवार या संपूर्ण गोष्टी बाजूला सारून व त्याग करून स्वातंत्र्याच्या अग्नी कुंडात उडी घेतली व लाखोंच्या संख्येने बलीदान दिले. परंतु आपली शोकांतिकाच म्हणावी लागेल की आपण भारत स्वतंत्र होऊन ७८ व्या वर्षीत पदार्पण करीत आहोत तरीही भारतातील भ्रष्टाचार थांबलेला नाही.आज भारतातील राजकीय पुढाऱ्यांजवळ, पुंजीपतीं, वॉलीउडक्षेत्र व भ्रष्ट सरकारी अधिकाऱ्यांजवळ वाममार्गाने कमवीलेली करोडोंची चल-अचल संपत्ती आजही आहे. ही संपत्ती एकत्र केली तर भारताला तब्बल १० वर्षे कोणाही जवळुन कर्ज घ्यावे लागणार नाही व गरीबी संपुष्टात येवु शकते आणि देश सुजलाम - सुफलाम होण्यास मोठी मदत मिळेल.याकरिता भ्रष्ट अधिकारी व भ्रष्ट राजकीय पुढारी ही देशाला लागलेली कीड आहे ही कीड जळामुळासकट नष्ट व्हायला हवी व यावर आळा बसायला हवा.आज मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी करोडो रुपयांची चल-अचल संपत्ती डांबुन ठेवल्याने व चलनात नसल्याने देशातील गरीब वर्ग गरीबीच्या खाईत जात आहे तर श्रीमंत वर्ग दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे व देशाच्या विकासामध्ये मोठा अडथळा निर्माण होत आहे.यामुळेच देशात महागाई व बेरोजगारी मोठ्या प्रमाणात दिसून येते.भारताचे प्रजासत्ताक दिनाचे ७५ व्या वर्षाचे औचित्य साधून देशातील संपूर्ण भ्रष्टाचाऱ्यावर कठोर कारवाई करून त्यांनी वाममार्गाने कमवीलेला पैसा सरकारने आपल्या तिजोरीत जमा करावा. यामुळे देशाचा विकास, बेरोजगारीची समस्या, महागाई यावर आळा घालण्यासाठी मोठी मदत होईल व देशाचा विकास भरभराटीला येईल.याचे स्वागत आपले पुर्वज,शहीद व स्वतंत्र सेनानी अवश्य करेल व त्यांच्या स्वतंत्र लढ्याला दिलासा अवश्य मिळेल हीच प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शहिदांना खरी आदरांजली ठरेल. देशात वाढते हवामानातील बदल, प्रदूषण व ग्लोबल वार्मिंगचा धोका पहाता.प्रजासत्तक दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला हवी. याकरीता शाळा, कॉलेज, संपूर्ण सरकारी क्षेत्र, राजकीय पुढारी, सामाजिक संघटना यांनी पुढाकार घ्यायला हवा.यामुळे मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होईल व प्रदूषणावर मात करण्यासाठी मोठी मदत मिळेल.आजच्या दिवशी वृक्षलागवड झाली तर ती अनंतकाळापर्यंत सर्वांच्या हृदयात राहील व लाखो शुरविरांचे दर्शन प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात व जळामुळात आपल्याला होईल. यामुळे भारतीय शहिदांची व शुरविरांची गाथा अबाध्य आहे.कारण त्यांच्या आशीर्वादानेच आपण आज मोकळा श्वास घेत आहोत.जय हिंद!

\-------------------------------------

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९,नागपूर.

# देशाभिमान बाळगा पण संविधान ही वाचवा !!

प्रविण बागडे नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

भारताला या ब्रिटीश राजवटीपासून १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले. या मागे भारताचा स्वातंत्र्य लढा आणि त्यातील महात्मा गांधी यांच्या अहिंसा पद्धतीचा मोठा सहभागआहे. तेव्हा स्वतंत्र भारताला स्वतःचे संविधान नव्हते. भारताचे मात्र कायदे हे भारतीय राज्य शासनाच्या १९३५ सालच्या कायद्यावर (कलमावर) आधारित होते. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र भारताचे संविधान तयार करण्यासाठी मसूदा समिती स्थापना केली गेली. या समितीने बाबासाहेबांना कसले ही सहकार्य केले नाही, उलट बाबासाहेबांनी संविधानाचा मसुदा तयार करून तो सभेपुढे ४ नोव्हेंबर १९४७ रोजी सादर केला. या सभेने सार्वजनिक चर्चेसाठी सभागृहात हा प्रस्ताव १६६ दिवसांसाठी खुला केला. २ वर्ष, ११ महिने आणि १७ दिवसाच्या कालावधी नंतर हा मसुदा अंतिम केला. एकटया बाबासाहेब आंबेडकरांनी घटना तयार करतांना त्यांनी कल्पनातीत परिश्रम घेतले व जी असामान्य बुध्दीमत्ता प्रगट केली ती खरोखरच संस्मरणीयच म्हणावी लागेल, यात शंका नाहीच. बाबासाहेबांमुळेच भारतीय राज्यघटना जगमान्य झाली. बरेचसे विचार विमर्श आणि सुधारणा केल्यानंतर समितीच्या ३०८ सदस्यांनी दोन हस्तलिखित प्रती (हिंदी आणि इंग्रजी) २४ जानेवारी १९५० रोजी स्वाक्षरांकित केल्या. दोन दिवसानंतर हे भारताचे संविधान संपूर्ण राष्ट्रासाठी समर्पित करुन लागू करण्यात आले. भारताच्या संविधानाच्या निमित्ताने भारताचा प्रजासत्ताक दिन हा साजरा करण्यात येऊ लागला. दरवर्षी प्रजासत्ताक दिन राष्ट्रीय दिन म्हणुन २६ जानेवारी ला साजरा केला जातो. २६ जानेवारी १९५० ला अंमलात आलेली स्वतंत्र सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक भारताची नवी राज्यघटना नव्याने स्वातंत्र्य मिळालेल्या भारतीय घटनेचे एक महान शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या संविधानाचा भारत देशाने स्वीकार करून लोकशाहीतील एका नव्या पर्वाची सुरुवात केली होती. लोकशाही म्हणजे जनतेसाठी, जनतेचे व जनतेने चालविलेल्या राज्यांचे तत्व अंतर्भूत केले आहे. ती घटना जर दीर्घकाळपर्यंत टिकावी अशी आपणांस इच्छा असेल तर आपणापुढे जी संकटे वाढून ठेवलेली आहेत, ती समजून घेण्यास आपण विलंब लावता कामा नये. तसेच त्याचे निराकरण करण्यास असमर्थ राहता कामा नये. देशाची सेवा करण्याचा हाच मार्ग आहे असेही डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले. २६ जानेवारी हा दिवस राज्यघटना अंमलात आणण्यासाठी निवडण्यात आला. या दिवशी देशभरात भारताच्या राष्ट्रध्वजाचे आरोहण होऊन त्याला वंदना दिली जाते. भारताचे राष्ट्रगीत म्हटले जाते आणि आदर व्यक्त केला जातो. हा दिवस आपल्या देशातील सुवर्ण दिन आहे. या दिवसाची प्राप्ती हजारो देशभक्तांच्या बलिदानातून झाली होती. या दिवशी शाळा महाविद्यालयांमध्ये भाषणाचे विविध देशभक्तीपर मनोरंजनाचे प्रेरणादायक असेकार्यक्रम आयोजित केले जातात.

महात्मा गांधींनी भगवान गौतम बुध्दाच्या तत्वज्ञानानुसार शांती व अहिंसेच्या मार्गाने लोकांना जागृत करुन देशात रक्तविहीन क्रांती केली, ही मोठी शक्ति गांधीजींच्या रुपात पाहायला मिळाली. गांधीजींच्या हाकेवर अनेक असाधारण लोक जमा झाले व त्या सगळयांच्या मदतीने स्वातंत्र्य लढा जिंकला. पं. जवाहरलाल नेहरु यांनी स्वातंत्र्य भारताला लोकशाहीमुल्ये रुजविण्यासाठी नवी दृष्टि दिली. देशाचा आर्थिककणा मजबूत व्हावा यासाठी त्यांनी पंचवार्षीक योजनेला दिले, त्याची फळे आज आपण चाखत आहोत.

आधूनिक भारताच्या जडणघडणीत काँग्रेसपक्षाने महत्वपूर्ण भूमीका बजावली आहे. सतत धर्मनिरपेक्षतेची कास धरुन कार्य केले. गरीबांच्या हक्काच्या रक्षणासाठी पुढाकार घेणारा काँग्रेस हा एकमेव पक्षआहे. ब्रिटीशांच्या जुलमी जोखडातून देशवासीयांना सोडविण्याचे सामर्थ्य केवळ काँग्रेस पक्षातच होते. स्वातंत्र्यपूर्व काळात आणि नंतर दैदिप्यमान काम करणाऱ्या या पूर्वजांनी सोपविलेला वारसा जोपासने आणि देशाला जगात अत्युच्य शिखरावर पोहचविण्याची सामाजिक आर्थिक व खाजगी स्वातंत्र्य मिळवून देण्याचे महत्त कार्य काँग्रेस कडून घडले, देशातील प्रत्येक नागरिकाला याची जाण आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा इतिहास केवळ आपल्यासाठीच नव्हे तर देशवासीयांसाठी प्रेरणादायी आहे. जगातील सर्वात मोठा लोकशाही पक्ष काँग्रेस असल्याबाबतचा कृतार्थ अभिमान आम्हाला आहे. धर्मनिरपेक्षता आणि स्वातंत्र्यता हे आमचे सुत्र राहिले आहे. त्यांच्या नेतृत्वात आम्ही जागतिक मंदीतही आर्थिक विकासाकडे मजल मारु शकलो हे काँग्रेसपक्षाच्या यशाचे गमक आहे. देशाला ब्रिटीशाच्या जुलमी विळख्यातून सोडविण्याची जबाबदारी आमच्यावर होती, ध्येयवेडे होऊनच आम्हाला ते साध्य करता आले.

जागतीक घडामोडीमध्ये याच काळात भारताच्या शब्दाला महत्व प्राप्त होऊ लागले. तद्नंतर दिवंगत प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांचे योगदान देशासाठी अनन्य साधारण महत्व होते. त्यांनी त्यांच्या काळात हरीतक्रांतीच्या माध्यमातून गरीबी हटाओ चा नारा देत जनसामान्याच्या आवाजाला हुंकार दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मांडलेल्या आर्थिक धोरणानूसार २० कलमी कार्यक्रम राबवून या देशात खऱ्या अर्थाने लोकशाही प्रस्थापित केली. त्यानंतर दिवंगत प्रधानमंत्री राजीव गांधी यांनी पाहिलेले २१ व्या शतकाने विज्ञान आणि तंत्रज्ञानाने भारताचे स्वप्न साकार केले, याचे संपूर्ण श्रेय दिवंगत प्रधानमंत्री राजीव गांधी यांना जाते. भारतातील काना कोपऱ्यात केलेला प्रवास, त्या भागातील प्रश्न आणि प्रत्येक भारतीयास समजुन घेण्याची त्यांची तळमळ यातूनच त्यांनी देशातील तरुण-तरुणींना पूढे आणले, हे विसरता येणे शक्य नाही, यामुळे देश प्रगल्भ अवस्थेत आहे. १५ जानेवारी १८४९ रोजी लेप्टनंट जनरल करिअप्पा हयांनी ब्रिटीश जनरल कडून कार्यभार स्वीकारला होता. हा दिवस देशभरात भारतीय सेना दिवस म्हणून साजरा केला जातो. देशाचा गौरव विशेष म्हणजे १५ जानेवारी २०२५ रोजी ७६ वर्ष पूर्ण झालीत. या ७६ वर्षाच्या इतिहासात भारतीय थलसेनेने असामान्य धैर्य, साहस, पराक्रम गाजवित भारत मातेच्या सीमेचे रक्षण केले. तसेच देशावर झालेल्या शत्रूंच्या आक्रमणा विरुध्द सडेतोड प्रतिउत्तर देवून शत्रूंना पायचित केले. भारतीय सेना जगात दुसरी मोठी सेना आणि चौथी शक्तीशाली सेना आहे. अशा या बलाढय, साहसी व पराक्रमी थलसेनेचा ७६ व्या वर्धापन दिनी भारतीय थलसेना दिवस म्हणुन देशभरात साजरा करण्यात आला. माजी पंतप्रधान दिवं. डॉ. मनमोहनसिंग यांनी अत्यंत सौम्य आणि संयम ऋषीमुर्तीने सुरळीत शासन चालवतांना नक्षलवाद, आतंकवाद, भाषावाद, प्रांतवाद, जातीयवाद या सर्ववादांना समुळ नेस्तनाबूत करण्यासाठी त्यांनी उचललेली पाऊले, खरेच देशाभिमान वाटावा अशीच म्हणावी लागेल. केवळ देशातच नव्हे, तर विदेशातही आदराचे स्थान कमावलेले आहे. आज भारताने जागतिक पातळीवर वेगळीच उंची गाठली आहे. देशाला आज ७६ वर्षे पूर्ण झालीत, ही अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. प्रजासत्ताक दिनाच्या आजच्या शुभदिनी राष्ट्राची अस्मिता आणि ऐक्य टिकवून ठेवण्यासाठी आपण कटीबध्द होऊ या !

कदम कदम बढाये जा, खुशी के गीत गाये जा
ये जिंदगी है कौम की, तू कौम पे लुटाये जा

# स्वातंत्र्य, राज्यघटना आणि प्रजासत्ताक




भारत १५ ऑगस्ट १९४७ ला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त झाला आणि २६ जानेवारी १९५० ला आपली राज्यघटना अंमलात आली. म्हणजेच भारत देश प्रजासत्ताक झाला. प्रजासत्ताक म्हणजे जिथे देशाचा प्रमुख वारसाहक्काने निवडला न जाता लोकनिर्वाचित पद्धतीने म्हणजे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष निवडणुकांच्या माध्यमातून निवडला जातो आणि जेथील सर्व शासकीय कार्यालये, पदे देशाच्या सामान्य नागरिकांसाठी खुली असतात. देशाने संविधानाचा स्वीकार करून लोकशाहीतील एका नव्या पर्वाची सुरुवात केली होती तो दिवस प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो. प्रजासत्ताक आणि लोकशाहीमधील महत्त्वाचा फरक हा आहे की, एकावर कायद्याने राज्य केले जाते तर दुस–यावर बहुमताने राज्य केले जाते. अर्थात प्रजासत्ताकाची देखरेख लोकांच्या निवडून आलेल्या प्रतिनिधींद्वारे केली जाते, परंतु ते शेवटी त्याच्या लिखित कायद्याद्वारे नियंत्रित केले जाते. याच राज्यघटनेनुसार आज आपलं सरकार, आपली राज्यव्यवस्था आणि एकूणच राज्यकारभार चालतो.

स्वातंत्र्य, बंधुता, स्त्री–पुरुष समानता ही मूल्ये भारतीयांनी स्वीकारली, जोपासली. त्यातून प्रजासत्ताक लोकशाही राष्ट्र म्हणून जगभर भारत देशाचा नावलौकिक झाला आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही राजव्यवस्था म्हणून भारत देशाचा उल्लेख होतो. विसाव्या शतकात स्वतंत्र झालेल्या अनेक राष्ट्रांनी लोकशाही स्वीकारली, पण ही व्यवस्था रुजण्यापूर्वीच अल्पकाळात मोडून गेली. लोकशाही स्वीकारली जाते, टिकविली जाते; पण ती रुजतेच असे नाही. असे का होते? कारण लोकशाही व्यवस्था ही माणसाची सहज प्रवृत्ती नाही. ती व्यवस्था माणसाच्या बौद्धिक आविष्कारातून प्रगटलेली, स्वीकारलेली, आचरणात आणलेली व्यवस्था आहे. त्यामुळे ही व्यवस्था मानवी मूल्यांनी स्थापित झालेली व्यवस्था आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता, स्त्री–पुरुष समानता या मूल्यांच्या प्रगट आचार–विचारातून निर्माण झालेली व्यवस्था म्हणजेच लोकशाही.

मग प्रश्न पडतो की १५ ऑगस्ट १९४७ पासून २६ जानेवारी १९५० पर्यंत देश कसा चालत होता? तब्बल २ वर्षं, ५ महिने आणि ११ दिवस भारताची काय परिस्थिती होती? आपल्यापैकी बहुतांश लोकांचा तर त्या काळी जन्मही झाला नव्हता. मग त्या दिवसांमध्ये काय काय घडलं होतं? या अशा घटना होत्या ज्यांचा आजही आपल्या आयुष्यावर परिणाम होतो.

स्वातंत्र्य मिळालं आणि देश स्वतंत्र झाला असला तरी देश चालवण्यासाठी घटना अजून तयार नव्हती. ९ डिसेंबर १९४६ पासून घटना समितीच्या बैठका सुरू झाल्या होत्या. १४१ दिवसांच्या परिश्रमानंतर ३ नोव्हेंबर १९४७ रोजी घटना समितीने पहिला मसुदा तयार केला. पण हा काही अंतिम मसुदा नव्हता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली पुढील अडीच वर्षांत घटना समितीची एकूण १२ सत्रं पार पडली. घटनेतील प्रत्येक शब्द तोलून–मापून आणि सर्व विचाराअंती लिहिण्यात आला. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय राज्यघटना स्वीकारण्यात आली, म्हणून तो दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो आणि २६ जानेवारी १९५० ला ती देशात अंमलात आणली गेली, तेव्हापासून आजपर्यंत आपण एक प्रजासत्ताक, सार्वभौम राष्ट्र म्हणून ओळखले जातो.

ज्या देशात घटनात्मक प्रमुखाची नियुक्ती निवडणुकीत होते, तो देश प्रजासत्ताक असतो. जो देश स्वतःच स्वतःला चालवतो आणि बाहेरच्या शक्तींवर अवलंबून नसतो, त्याला सार्वभौम म्हणतात. ब्रिटनमध्ये लोकशाही आहे, पण ते प्रजासत्ताक नाही. कारण त्या देशाची घटनात्मक प्रमुख ही राणी आहे.

राष्ट्रपती आणि पंतप्रधान १५ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्री दिलेल्या भाषणात पंडित जवाहरलाल नेहरू म्हणाले होते की नियतीशी आम्ही करार केला होता. त्या करारानुसारच आजची स्वातंत्र्याची पहाट आम्हाला पाहायला मिळाली आहे.

१९४७ मध्ये आर्थिक कार्यक्रम समिती स्थापित करण्यात आली होती. पंडित नेहरू त्या समितीचे अध्यक्ष होते. भारताच्या आर्थिक प्रगतीची दिशा काय असावी? याचं धोरण या समितीनं ठरवलं होतं. भारतातील उद्योगधंद्यांपैकी ७५% उद्योग हे भारतीयांच्या मालकीचे होते. स्वतंत्र होण्याआधीपासूनच भारतीय उद्योजक युरोपियन व्यापा–यांच्या स्पर्धेत होते. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर बिर्ला, टाटा, सिंघानिया, दालमिया, जैन यांचे उद्योग अधिक बळकट झाले आणि भारताच्या प्रगतीमध्ये मोठा वाटा उचलला. मार्च १९५० मध्ये नियोजन समितीची स्थापना झाली. १९५१ ला पंचवार्षिक योजना सुरू झाली. त्याची पायाभरणी १९४७ ते १९५० या काळात झाली असं आपण म्हणू शकतो.

भारतात अनेक जाती आणि धर्मांचे, वेगवेगळ्या संस्कृतीचे, वर्गाचे लोक एकत्र राहतात. भारतीय लोकशाहीमुळेच वेगवेगळ्या गटांना संसदेत प्रतिनिधित्व मिळालं आहे. भारतीय लोकशाही बळकट करण्याचं श्रेय हे भारतीय स्वातंत्र्यानंतर राज्यघटना निर्मितीच्या प्रक्रियेलाच द्यावं लागेल. भारतीय संविधान हे अनेक लोकांच्या परिश्रमातून, अभ्यासातून आणि संशोधनातून निर्माण झालं आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ड्राफ्टिंग कमिटीचे म्हणजेच घटनेच्या मसुदा समितीचे प्रमुख होते. भारतीय संविधानाचं स्वरूप कसं असावं? त्याची चौकट त्यांनी आखली. विविध विषयांवरील तज्ज्ञांकडून मिळणारी माहिती, त्यांच्या सूचना ध्यानात घेऊन त्या राज्यघटनेत कशा येतील याचा विचार बाबासाहेबांनी केला. राज्यघटनेच्या निर्मितीत त्यांनी जो मोठा वाटा उचलला आहे त्यामुळे त्यांना राज्यघटनेचे शिल्पकार म्हटलं जातं.

राज्यघटना तयार करण्याची प्रक्रिया ही प्रदीर्घ होती. ९ डिसेंबर १९४६ रोजी भारताची घटना समिती पहिल्यांदा एकत्र येवून पहिली बैठक झाली आणि त्यांनी भविष्यातल्या भारताची दिशा ठरवली. घटनेच्या मसुदा समितीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची नियुक्ती २८ ऑगस्ट १९४७ रोजी झाली. त्यानंतर २ वर्षं, ११ महिने आणि १८ दिवसांच्या परिश्रमानंतर २६ नोव्हेंबर रोजी राज्य घटनेचा मसुदा तयार झाला. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय राज्यघटना स्वीकारण्यात आली आणि २६ जानेवारी १९५० ला ती अंमलात आणली गेली.

---------------------

शब्दस्पर्शी–सुनील शिरपुरे
कमळवेल्ली,यवतमाळ
भ्रमणध्वनी–७०५७१८५४७९

# भारतीय संविधान संपूर्ण रूपाने समस्त भारतीयांच्या हितासाठी

घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेची प्रत संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांना २६ नोव्हेंबर १९४९ ला सुपूर्द केली आणि २६ जानेवारी १९५० रोजी आपले भारतीय संविधान संपूर्ण रूपाने समस्त भारतीयांच्या हितासाठी लागू करण्यात आले. संपूर्ण भारतामध्ये २६ जानेवारी हा दिवस प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केल्या जातो. भारतीय संविधानातील उद्देशिका संविधानातील अनुच्छेदानुसार भारतात कायदे तयार होतात व त्याची अंमलबजावणी होते आपल्या भारतीय संविधानाची साधारण बावीस भागात विभागणी केली आहे. प्रथम भाग संघराज्य व राज्य क्षेत्र, दुसरा भाग नागरिकत्व, तिसरा भाग मूलभूत हक्क, चौथा भाग राज्याचे धोरण, पाचवा भाग संघराज्याची कार्यकारी यंत्रणा, सहावा भाग राज्य व त्यांची कार्यकारी यंत्रणा,सातवा भाग सर्वसाधारण कार्यपद्धती,आठवा भाग संघराज्य क्षेत्र,नववा भाग पंचायती, दहावा भाग अनुसूचित क्षेत्र व जनजाती क्षेत्र,अकरावा भाग राज्य व संघराज्यातील संबंध, बारावा भाग वित्त विभाग, तेरावा भाग भारताच्या व राज्यक्षेत्रातील व्यापार व धोरणे,चौदावा भाग सेवा, पंधरावा भाग निवडणुका, सोळावा भाग विवक्षित वर्गासंबंधी विशेष तरतुदी,सतरावा भाग राजभाषा,अठरावा भाग आणीबाणी संबंधित तरतुदी,एकोणीसावा भाग संकीर्ण, विभाग विसावा भाग संविधानाची सुधारणा, एकवीसवा भाग आस्थायी,संक्रमणकालीन व विशेष तरतुदी, बाविसवाभाग संक्षिप्त नावे,प्रारंभ,प्राधिकृत हिंदी पाठ व निरसने. अशाप्रकारे संविधानाची थोडक्यात विभागणी आपणास दिसून येते.

भारतीय संविधानामध्ये सामाजिक, धार्मिक,शैक्षणिक, राजकीय, व्यापार,न्यायालयीन अशा सर्व विषयावर संपूर्ण सखोल अभ्यास केला आहे. आपण देशाचे नागरिक म्हणून जीवन जगत असताना आपण जरी उल्लेखित सर्व क्षेत्राविषयी जाणून घेऊ शकलो नाही तरी एक स्वतंत्र भारताचा नागरिक म्हणून आपले काय हक्क व अधिकार आहेत,त्याचप्रमाणे देशाचे अखंडत्व सार्वभौमत्व राष्ट्राचे हित जोपासण्यासाठी काही मूलभूत कर्तव्य सुद्धा दिले आहेत त्याचे पालन करणे गरजेचे आहे.भारतीय संविधानामध्ये एक भारतीय नागरिक म्हणून त्यावर कुठल्याही प्रकारचा अन्याय होणार नाही याची पूर्णपणे दक्षता घेतली आहे,त्याचबरोबर आपण भारतीय नागरिक म्हणून आपले देशाप्रती काय कर्तव्य आहे ते सुद्धा सांगितले आहे व त्याच कर्तव्याचे पालन न केल्यास योग्य तो दंड किंवा कारवाईची तरतूद केली आहे म्हणून भारतीय संविधान लवचिक व कडकपणाचे अद्वितीय मिश्रण आहे. हे संपूर्ण भारत देशासाठी व समस्त नागरिकांसाठी अतिशय मौल्यवान व मार्गदर्शक आहे.

भारतीय संविधानानुसार आपणास मूलभूत हक्क दिले असून त्याच्याविषयी ढोबळमानाने माहिती पुढील प्रमाणे अशी की सर्वप्रथम मूलभूत हक्क हा समानतेचा आहे त्यानुसार धर्म वंश जात किंवा जन्मस्थान या कारणावरून भेदभाव करण्यास सक्त मनाई आहे अर्थात समाजातील सर्व स्तरावरील लोकांना सार्वजनिक वापराच्या जागा वापरण्यास खुल्या आहेत. भारतीय संविधानानुसार दुसरा मूलभूत हक्क हा स्वातंत्र्याचा हक्क,यामध्ये प्रामुख्याने भाषण व विचार करण्याचा हक्क आहे. आपले विचार आपण मांडू शकतो, दुसरे असे की, शांततेने व विनाशस्त्र एकत्रित जमण्याचा हक्क आहे. यानुसार सर्व जाती धर्मातील लोक शांततेने शस्त्रविना एकत्रित राहू शकतात.तिसरे असे की अधिसंध अर्थात सहकारी संस्था स्थापन करण्याचा हक्क आपणास दिला असून त्या माध्यमातून आपण एकमेकांना सहकार्य करून उद्योग, व्यवसाय,सामाजिक उपक्रम राबवू शकतो. चौथा हक्क असा की भारताच्या सर्व राज्यक्षेत्रामध्ये मुक्तपणे संचार करू शकतो उदा.महाराष्ट्राचा मनुष्य उत्तर भारतामध्ये पर्यटक म्हणून फिरू शकतो त्याचप्रमाणे पाचवाहक असा की कोणत्याही राज्यात राहू शकतो व तेथे स्थायिक होऊ शकतो. तिसरा मूलभूत शोषणाविरुद्धचा हक्क यानुसार कोणत्याही नागरिकास अपव्यापार व वेठबिगारी म्हणून ठेवण्यास मनाई आहे अर्थात वैयक्तिक व सामाजिक प्रयोजनाच्या दृष्टीने भारताच्या कोणत्याही नागरिकास धर्म,जात वंश,वर्ग यावरून भेदभाव केल्या जाणार नाही त्यांच्याकडून अपव्यापार व वेठबिगारी सारखे कामावर ठेवून घेता येणार नाही, त्याचप्रमाणे कारखाने, व्यवसाय या ठिकाणी बालकांना कामगार म्हणून ठेवता येणार नाही.भारतीय संविधानानुसार चौथा मूलभूतहक्क हा स्वातंत्र्याचा हक्क आहे,यानुसार सदसदविवेक बुद्धीने स्वातंत्र्य आणि धर्माचे मुक्त प्रकटीकरण आचरण व प्रसार करण्याचा भारतातील प्रत्येक नागरिकास संविधानाने हक्क दिला आहे. अर्थात स्वधर्माविषयी आचरण,प्रसार,पालन करण्याचे पूर्णपणे स्वातंत्र्य दिले आहे मात्र त्याचबरोबर इतर धर्माचा आदर करण्याचे कर्तव्य सुद्धा दिले आहे.भारतीय संविधानानुसार प्रत्येक भारतीय नागरिकास सहावा मूलभूत सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क दिला आहे,त्यानुसार भारताच्या कोणत्याही राज्यक्षेत्रात कोणत्याही व्यक्तीला शिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेण्याचा अधिकार आहे,त्याला केवळ, धर्म,जात, वंश भाषा किंवा अन्य कारणावरून प्रवेश ना करता येणार नाही. भारतीय संस्कृतीमध्ये ज्या संस्कृती आहे जसे कि, भाषा किंवा परंपरागत संस्कृती जतन व पालन करण्याचा हक्क दिला आहे. संस्कृती पालन व जतनाबरोबर कुठल्याही प्रकारचा भेदभाव प्रकट होणारे कृत्य होणार नाही याची दक्षता घेणे गरजेचे आहे. शैक्षणिक संस्था स्थापन करून,सर्वांसाठी शिक्षण खुले करण्याचा हक्क देण्यात आला आहे,अशाप्रकारे भारतीय संविधानाने भारतीय नागरिक म्हणून आपणास वरील हक्क प्रस्थापित केले आहे.

भारतीय संविधानाने हक्कांबरोबर आपण एक भारतीय नागरिक म्हणून काही मूलभूत कर्तव्य सुद्धा सांगितले आहे जेणेकरून देशाचे अखंडत्व, सार्वभौमत्व व शांतता कायम राहील त्यानुसार आपली कर्तव्य असे की, संविधानाचे पालन करणे राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करणे. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील स्मृति स्थाने व आदर्श यांचे जोपासना करणे. भारताचे सार्वभौमत्व,एकता व एकात्मता ठेवणे त्याचे संरक्षण करणे. देशाच्या संरक्षणासाठी राष्ट्रीय सेवा बजावणे.धर्म,भाषा, प्रदेश,वंश,वर्ग यापलीकडे जाऊन समस्त भारतीय जनतेप्रती सामंजस्य व बंधुभाव वाढीला लावणे.स्त्रियांचा आदर व त्यांच्या प्रतिष्ठेला बाधा ठरतील अशा प्रथांचा त्याग करणे. सार्वजनिक क्षेत्र व नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करून प्राणी मात्राबद्दल दयाभाव बाळगणे. मानवतावादी,विज्ञानवादी व संशोधनबुद्धी व सुधारणावादी दृष्टिकोन ठेवून विकसित करणे. सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे.हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे. राष्ट्राच्या विकासासाठी सतत कार्यरत राहणे. मातापित्याने आपल्या अपत्यांना सहा ते चौदा वयापर्यंत अर्थात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत असल्यामुळे त्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे,त्याचप्रमाणे वृद्धावस्थेत मातापित्यांची सेवा करणे (घटनादुरुस्तीनुसार) ही प्रत्येक भारतीय नागरिकांची कर्तव्य असतील.

अशाप्रकारे भारताचे संविधान अर्थात राष्ट्रग्रंथ हा सर्वोत्परी आपल्या हितासाठी आहे.आपल्या उत्कर्षासाठी आहे, तरी प्रत्येकाने भारतीय संविधानाचा सन्मान करणे गरजेचे आहे.भारतीय नागरिक म्हणून आपल्याला हक्काची व कर्तव्याची जाणीव असणे गरजेचे आहे. भारतीय संविधानातील उद्देशिका व संविधानातील अनुच्छेद अनुसार भारतात कायदे तयार होतात त्याप्रमाणे अंमलबजावणी झाली, तर भारत जगातील सर्वश्रेष्ठ गणराज्य ठरेल.प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा. प्रजासत्ताक दिन चिरायू होवो...!

श्री विनोद शेनफड जाधव
मासरूळ जि.बुलढाणा
मो.९७६३२८२०७७

# दीपिका पदुकोण लग्नाआधी ग्लोइंग त्वचेसाठी नियमित करत होती 'या' पेयाचे सेवन,चेहऱ्यावर येईल नैसर्गिक चमक

दीपिका पदुकोण तिच्या लग्नाच्या तीन महिने आधी सिक्रेट ड्रिंकचे सेवन करत होती. या ड्रिंकच्या सेवनामुळे लग्नात तिची त्वचा अतिशय सुंदर आणि चमकदार दिसत होती. जाणून घ्या लग्नाआधी दीपिकाने कोणत्या सिक्रेट ड्रिंकचे केले सेवन.

लग्न सराईच्या दिवसांमध्ये त्वचेची जास्त काळजी घ्यावी लागते. त्वचेवर आलेले पिंपल्स, फोड, मुरुम कमी करण्यासाठी अनेक मुली डॉक्टरांच्या सल्ल्याने औषध उपचार करतात. मात्र काही वेळा गोळ्या औषधांमुळे त्वचेची गुणवत्ता आणखीनच खराब होऊन जाते. अशावेळी त्वचेची काळजी घेण्यासाठी घरगुती पेयांचे सेवन करावे. बॉलीवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री दीपिका पदुकोण तिच्या अभिनयामुळे सगळीकडे प्रसिद्ध आहे. तसेच तिच्या सौंदर्याचे अनेक चाहते सुद्धा आहेत. तिने लग्न होण्याच्या तीन महिने आधीपासून त्वचेची काळजी घेण्यासाठी आहारात घरगुती पेयांचे सेवन करण्यास सुरुवात केली होती. या पेयाच्या सेवनामुळे तिची त्वचा अतिशय सुंदर आणि चमकदार झाली होती. या ज्युसच्या सेवनामुळे लग्नाच्या दिवशी तिची त्वचा अगदी सुंदर, ग्लोइंग, चमचमती दिसत होती. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला लग्न होण्याआधी सुंदर आणि चमकदार त्वचेसाठी दीपिका कोणत्या पेयाचे सेवन करत होती, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत.(फोटो सौजन्य – )

दीपिका पदुकोण सुंदर आणि चमकदार त्वचेसाठी लग्नाआधी घरगुती पदार्थांपासून तयार करण्यात आलेल्या पेयाचे सेवन करत होती. घरगुती पदार्थांचा आहारात समावेश केल्यामुळे त्वचा अधिक सुंदर आणि चमकदार दिसते. याशिवाय त्वचेवर नैसर्गिक सौंदर्य टिकवून ठेवण्यासाठी आहारात बीट, गाजर आणि विटामिन सी





युक्त पदार्थांचे सेवन करावे. चला तर जाणून घेऊया ज्युस बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:

कडुलिंब
पुदिना
कढीपत्ता
कोथिंबीर
बीटरूट
पाणी

कृती:

मिक्सरच्या भांड्यात पुदिन्याची पान, कोथिंबीर, कडुलिंबाची पाने, कढीपत्ता, बीटरुटचे तुकडे घेऊन त्यात आवश्यकतेनुसार पाणी घालून मिक्सरमधून बारीक वाटून घ्या. त्यानंतर तयार केलेल्या ज्युसमध्ये थोडस पाणी घालून मिक्स करा. तयार केलेल्या ज्युसचे नियमित सेवन केल्यास त्वचेसह आरोग्याला अनेक फायदे होतील. लग्नाआधीचे तीन महिने बीटच्या रसाचे नियमित सेवन केल्यास त्वचा, केस आणि आरोग्याला अनेक फायदे होतील.

दिपीका तिच्या स्किन केअरमध्ये करते 'या' ज्यूसचे सेवन:

बीटरूटच्या रसाचे सेवन केल्यामुळे त्वचा अधिक सुंदर आणि चमकदार दिसते. हा ज्यूस पुदिन्याची पान, कोथिंबीर, कडुलिंबाची पाने, कढीपत्ता इत्यादी गुणकारी पदार्थ एकत्र करून तयार करण्यात आला आहे. बीटचे सेवन केल्यामुळे शरीरात लोहाची पातळी वाढते आणि आरोग्याला अनेक फायदे होतात. कडुलिंबाच्या पानांमध्ये असलेल्या गुणधर्मांमुळे शरीरात साचून राहिलेली घाण स्वच्छ होते आणि त्वचेवर आलेले डाग, पिंपल्स कायमचे निघून जातात. हा ज्यूस त्वचा आणि केसांसाठी अतिशय फायदेशीर आहे. चेवर आलेल्या बारीक रेषा, सुरकुत्या घालवण्यासाठी बीट मदत करते. विटामिन सी च्या सेवनामुळे त्वचेवर आलेलोए काळे डाग कमी होऊन त्वचा तरुण आणि चमकदार दिसते.

टीप – हा लेख केवळ सामान्य माहितीसाठी लिहिण्यात आला असून कोणत्याही प्रकारच्या उपचाराचा दावा यामध्ये करण्यात आलेला नाही. कोणताही उपाय करण्यापूर्वी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि त्यांच्या सल्ल्यानुसारच योग्य बदलानुसार वापर करावा.

# नेताजी सुभाषचंद्र बोस हे भारतीय स्वातंत्र्याचे महानायक होते-डॉ. हनुमंत सौदागर



केज/प्रतिनिधी-तुम मुझे खून दो मैं तुम्हे आजादी दूंगा, जय हिंद..! ही घोषणा देऊन भारतीय तरुणांना एकत्र करून आझाद हिंद सेनेच्या माध्यमातून भारत मातृभूमीला गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी बलिदान देणारे सरसेनापती सुभाषचंद्र बोस म्हणजे भारतीय स्वातंत्र्याचे महानायक असल्याचे प्रतिपादन डॉ.हनुमंत सौदागर यांनी केले. ते महानायक सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. भाऊसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालय, सरस्वती महाविद्यालय व भाऊसाहेब पाटील अध्यापक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य विजयकुमार शिनगारे हे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते महानायक सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना प्राचार्य शिनगारे म्हणाले की, भारतीय स्वातंत्र्यलढा हा महानायक सुभाषचंद्र बोस यांच्याशिवाय पूर्णच होऊ शकत नाही. त्यांच्या बलिदानाचे स्मरण करून राष्ट्र निर्माणसाठी विद्यार्थ्यांनी एकत्र येण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.सीता केंद्रे त्यांनी तर आभार डॉ.नागेश कराळे यांनी मानले. यावेळी प्राध्यापक वृंद शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

# शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने केज येथे भारत माता व भारतीय संविधानाच्या प्रतिमेचे पुजन!



केज/प्रतिनिधी -शिवसेना पक्षप्रमुख मा. उद्धवजी ठाकरे यांच्या आदेशावरून संपर्क नेते सुनील प्रभू, मराठवाडा समन्वयक उपनेते विश्वनाथ नेरूरकर, उपनेत्या माननीय सुषमाताई अंधारे, बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव, लोकसभा प्रमुख माजी आमदार सुनील दादा धांडे, सहसंपर्कप्रमुख बाळासाहेब अंबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली, बीड जिल्हा प्रमुख रत्नाकर शिंदे यांच्या उपस्थितीत, केज तालुका प्रमुख अशोक जाधव यांच्या नेतृत्वाखाली आज दिनांक २५ जानेवारी २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक केज येथे भारत मातेच्या प्रतिमेचे व भारतीय संविधानाचे पुजन करून भारत माता की, जय छत्रपती शिवाजी महाराज की, जय भारतीय संविधानचा विजय असो अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

यावेळी जिल्हा सचिव रोहित कसबे, जिल्हा संघटक दिलीप जाधव, युवा सेना तालुका प्रमुख किशोर घुले, उपतालुकाप्रमुख सूरज वाघमारे, मारोती गव्हाने ,वैजनाथ वाघमारे, हरिष गिते,राम गवळी,अनिकेत गायकवाड,सखाराम वायबसे सह शिवसैनिक उपस्थित होते.

# लक्ष्मी मुंडे नर्सिंग कॉलेजमध्ये आज पालक मेळाव्याचे आयोजन

केज/प्रतिनिधी -शहरापासुन जवळच असलेल्या बीड रोडवरील लक्ष्मी मुंडे नर्सिंग कॉलेजमध्ये दि.२६ जानेवारी रविवार रोजी प्रजासत्ताक दिनानिमीत्त पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहीती प्राचार्य रवि पवारसर यांनी दिली आहे.

सिध्दीविनायक शैक्षणिक सेवाभावी संस्थेशी सलग्न असलेल्या केज शहरातील लक्ष्मी नर्सिंग कॉलेज मध्ये ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमीत्त दि.२६ जानेवारी रविवार रोजी सकाळी साडेआठ वाजता संस्थापक अध्यक्ष रमाकांत (बापू) मुंडे यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात येणार आहे.या कार्यक्रमानंतर लक्ष्मी मुंडे नर्सिंग कॉलेजमध्ये पालक मेळाव्याचे आयोजनही करण्यात येणार आहे.या पालक मेळाव्याला मार्गदर्शन करण्यासाठी भागवत कथाकार ह.भ.प.केशव शास्त्री महाराज सारुकवाडीकर,श्रीराम कथाकार ह.भ.प.केशव शास्त्री महाराज घुले टाकळीकर,माजी जि.प.सदस्या उषाताई मुंडे या उपस्थित राहणार असल्याची माहीती प्राचार्य रवि पवारसर यांनी दिली आहे.

# व्हॉइस ऑफ मीडिया लातूर डिजिटल विंगची कार्यकारणी जाहीर

लातूर: व्हॉइस ऑफ मीडिया डिजिटल विंगचे अध्यक्ष डॉ सितम सोनवणे यांनी आज कार्यकारणी जाहीर केली. या कार्यकारणीत उपाध्यक्ष अजय कुमार बोराडे पाटील, इस्माईल शेख, कार्याध्यक्ष हमीद शेख, सरचिटणीस अमोल इंगळे, सह सरचिटणीस उमेश कांबळे, कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर परांडे, कार्यवाहक नितीन गुडे, प्रसिद्धी प्रमुख राम रोडगे, संघटक नेताजी जाधव, राजेंद्र देबडवार आदींचा समावेश या कार्यकारणी करण्यात आला आहे. या निवडीबद्दल लातूर हॉइस ऑफमीडियाचे अध्यक्ष संगम कोटलवार, जिल्हा कार्याध्यक्ष शहाजी पवार, दीपरत्न निलंगेकर, सरचिटणीस बालाजी फड, सह सरचिटणीस निशांत भद्रेश्वर, उपाध्यक्ष विनोद चव्हाण, आनंद माने, कोषाध्यक्ष बाळासाहेब जाधव, प्रसिद्धीप्रमुख योगीराज पिसाळ, प्रवक्ता अनिल पुरी, सचिन चांडक आदींनी कार्यकारिणीचे अभिनंदन केले.

# चांगले वाचा,नीट शिका तरच जीवनात यशस्वी व्हाल कथाकार जी.जी.कांबळे यांचा संदेश




लातूर :- जीवनाला योग्य दिशा देणार्या,मार्गदर्शक ग्रंथाचे खुप वाचन करा,मन लावून शिक्षण घ्या,चांगले शिकलात तर अधिकारी व्हाल,वाईट संगत,चोरी कराल तर शिक्षा भोगाल,असा संदेश प्रसिध्द कथाकार जी.जी.कांबळे यांनी येथे दिला.

वाचन संकल्प महाराष्ट्राचा अंतर्गत लातूरच्या सम्राट अशोक सार्वजनिक वाचनालयाला २० जानेवारी २०२५ रोजी २३ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल कै.सखाराम पाटील प्राथमिक विद्यालयाच्या सहकार्याने दि.२१ जानेवारी २०२५ रोजी शाळेच्या सभागृहात कथाकथनाचा कार्यक्रम आयोजित केला होता,त्यावेळी जी.जी.कांबळे यांनी दोन मित्र ही कथा सांगून मुलांना वरील संदेश दिला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी लोकसेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव व्ही.एस.जाधव हे होते.मंचावर ज्येष्ठ साहित्यिक अमृतराव सूर्यवंशी व ज्येष्ठ पत्रकार आबा गायकवाड,कै.सखाराम पाटील प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक विकास वाघमोडे,ग्रंथपाल अंजुषा काटे यांची उपस्थिती होती.

शालेय जीवन अतिशय महत्वाचे आहे,या वयात मन लावून शिकले तर जीवनाची वाटचाल योग्य दिशेने जावू शकते,कुचाराई न करता नीट शिका,वाचनालयात जावून अवांतर वाचन करुन ज्ञानी,गुणवान बना,सभाधीट बना,असा मौलाचा सल्ला देत लहानपणी चांगले शिकणारा अधिकारी झाला आणि लहानसहान चोर्या करणारा पुढे चोरटा होवून तुरुंगात गेला यासंदर्भातली रंग्या कथासंग्रहातील दोन मित्र ही कथा जी.जी. कांबळे यांनी मुलांशी संवाद साधत कथन केली.

अमृतराव सूर्यवंशी यांनी प्रतिकुल परिस्थितीत शिक्षण घेतल्याने शिक्षक,मुख्याध्यापक,साहित्यिक होता आले याचे स्वतःचे उदाहरण देवून मुलांना शिक्षण व वाचन करण्याचा सल्ला दिला.पत्रकार आबा गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप व्ही.एस.जाधव यांनी केला.

वाचनालयाचे सचिव बाळकृष्ण होळीकर यांनी ग्रंथालयात स्पर्धा परीक्षा,बालकांसह १२ हजार ग्रंथ,२५ नियतकालिके,८ दैनिकामधून वाचकांना सेवा देण्यात येत आहे,ग्रंथालयाने २४ वा वर्धापन दिनात प्रवेश केल्याचा आनंद व्यक्त करुन,या शाळेच्या विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाचे वाचक सभासद होवून ग्रंथाचा लाभ घ्यावा असे आवाहन केले,तसेच पाहुण्याचा परिचयही प्रास्ताविकातून करुन दिला.प्रारंभी ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस.आर.रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले.ग्रंथालयाच्या वतीने सर्व मान्यवरांचे ग्रंथ भेट देवून तर शाळेच्या वतीने मान्यवरांचे शाल,पुष्पहाराने स्वागत करण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व शाळेची माहिती शिक्षक व्ही.पी.तळेगावे यांनी केले दिली. सहशिक्षक नामदेव भंडारे यांनी आभार मानले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक नामदेव जाधव, शैलजा शिंदे, उषा क्षीरसागर, कल्पना थोरात, वीरनाथ तळेगावे,अमोल कल्लेकर,ग्रंथालयाचे लिपिक संकेत होळीकर यांनी परिश्रम घेतले.यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माहूर गड ऐतिहासीक पौराणिकमुळे विदेशी पर्यटकांची रेलचेल वाढली



किनवट : शेख शौकत -माहूर गडावर असलेली देवस्थाने तथा किल्ला पांडवलेणी सह सोनापीर दर्गा यासह अनेक ऐतिहासिक पौराणिक स्थळे असल्याने नेहमीच येथे विदेशी पर्यटक येत असतात दिनांक २४ रोजी पोलॅड येथून पती पत्नी मोटरसायकल द्वारे महाराष्ट्र पर्यटन भ्रमण अंतर्गत माहूर येथे पोहोचले रेणुका देवी संस्थान येथे नगरसेविकापती राजू सौंदलकर आणि व्यापारी असोसिएशनच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. माहूर गडावर विदेशी पर्यटकांची रेलचेल वाढली आहे. माहूर तालुक्यात पौराणिक ऐतिहासिक प्रेक्षणीय स्थळे धार्मिक स्थळे पर्यटन स्थळे मोठ्या प्रमाणात असून पर्यटकांना ट्रेकर्सना आकर्षित करण्यासाठी येथे किल्ला असून किल्ल्यातही मस्जिद दर्गा मंदीर असल्याने आलेले पर्यटक सोनापिर बाबा दर्गा व किल्ल्यात भ्रमंतीसाठी येत असतात तसेच अनेक उंच टेकडे असल्याने ट्रेकर्सही मोठ्या प्रमाणात घेऊन आपली हौस थोडक्यात भागवून घेतात येथे त्या प्रमाणात पर्यटक ट्रॅकर साठी सुविधा नसल्याने पर्यटकांची संख्या सध्या कमी आहे. बऱ्याच दिवसानंतर पर्यटनासाठी विदेशी पाहुणे असल्याने त्यांना पाहण्यासाठी मंदिर परिसरात मोठी गर्दी जमली होती पोलॅड येथील पती-पत्नी जोडप्याने मुंबई येथून यामा कंपनीची मोटर सायकल भाड्याने घेत संपूर्ण महाराष्ट्रभर पर्यटन करणार असल्याने पुढील प्रवासासाठी त्यांना नागरिकांनी शुभेच्छा दिल्या.

# श्रीमद भगवद गीतेतून निष्काम कर्मयोगाची शिकवण ह.भ.प. बजरंग महाराज फड यांचे विचार; एमआयटीत श्रीमद भगवदगीता पारायण सोहळा



लातूर :- कोणत्याही फळाची अपेक्षा न ठेवता केलेले काम हे निष्काम कर्म होते. निष्काम कर्मातून मानवास निश्चितच सुख, शांती आणि समाधान लाभते व त्याची शेवटी फलश्रुतीही होते. त्याचप्रमाणे श्रीमद भगवद गीतेतील कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन। हा श्लोक निष्काम कर्मयोग शिकवीतो, असे विचार ह.भ.प. बजरंग महाराज फड यांनी श्रीमद भगवदगीता पारायणातून व्यक्त केले.

एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांच्या संकल्पनेतून गीतारुपी ज्ञानयज्ञाचे अमृतपान शनिवारी षट्तिला एकादशी निमित्त लातूर येथील एमआयटी संत ज्ञानेश्वर डोम येथे संपन्न झाले. श्रीमद भगवदगीता पारायण सोहळ्यातील ग्रंथांचे पूजन कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड व सौ. कुमुद हनुमंत कराड यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर सकाळी ८ वाजता गीता पारायणास सुरुवात झाली. श्रीमद भगवदगीता पारायणामुळे जीवन जगण्याचा सकारात्मक दृष्टिकोन मिळतो. त्याचबरोबर जिवनातील महत्वकाक्षांचे ओझे व निर्थक तान कमी होण्यास मदत होते. गीता नोव्हे ग्रंथ, तो आहे जीवन तिर्थ. गीतेमध्ये अर्जुन सामान्य व्यक्तींचे प्रतिनिधित्व करीत असून तो कीमकरोती पासून करीस्य वचनं तव पर्यंतचा श्रीकृष्ण - अर्जुन संवाद म्हणजे गीता असल्याचे सांगून पुढे पारायणात ह.भ.प. बजरंग महाराज फड म्हणाले की, कर्म, ज्ञान, भक्ती यांचा त्रिवेनी संगम हा मानवाचे जीवन सुखी-समाधानी करण्यासाठी महत्त्वाचा ठरतो. गीतेचे नित्य पठन करणारा कधीच दिन, दुबळा, लाचार राहत नाही. त्यासोबतच स्वाभिमानी जीवन जगण्याचा मंत्रही गीता पठणातून मिळतो. त्यामुळे प्रत्येकाने गीतेचे पठण करावे. गीता या ग्रंथात समग्र मानव जातीच्या कल्याणाचा सार दडलेला असल्याचे त्यांनी सांगितले. या श्रीमद भगवदगीता पारायणास कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, सौ. कुमुद हनुमंत कराड, ह.भ.प. वामन महाराज जाधव, डॉ. सुजित झाडके, एमआयडीएसआर रुग्णालय प्रशासकीय अधिकारी अजय तिवारी, ज्ञानोबा केंद्रे, गोविंद गिराम, यादव डोंगरे, परमेश्वर सोनवणे, देविदास साळुखे, विठ्ठल मुंडे, प्रशांत कोरे, गोरख सावंत व प्रियंका कराड, वृषाली चिखलीकर, गौळण कस्तुरे, मुद्रिका सांगळे, गौळण सुरवेसे आदी सहभागी होते. श्रीमद भगवदगीता पारायण सोहळ्याचे सूत्रसंचालन ज्ञानोबा केंद्रे यांनी करुन शेवटी आभार मानले. यावेळी एमआयटी वैद्यकीय महाविद्यालय शिक्षण संकुलातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# बालरंगभूमी परिषदेच्या वतीने २० शाळांमध्ये तिरंगा ध्वज वाटप

## लातूर शाखेचे प्रजासत्ताक दिनाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त २० शाळांमध्ये अभिनव उपक्रम

लातूर :- महाराष्ट्राची कला व परंपरा जपताना बालमनावर संस्कार करत, कलासक्त पण सशक्त पिढी घडवण्याचे कार्य गेली अनेक वर्षे बालरंगभूमी परिषद करते आहे. त्याच अनुषंगाने यंदा आपल्या प्रजासत्ताक दिनाला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. याच दिवशी भारत सरकारने आपले पवित्र संविधान लागू केले. या दोन्हीचे अमृत महोत्सवी वर्ष परिषदेच्या राज्याध्यक्षा मा. ॲड. निलम शिर्के - सामंत, राज्य उपाध्यक्ष ॲड. शैलेश गोजमगुंडे व प्रदेश कार्यकारिणीच्या सूचनेनुसार लातूर शाखा बालकांसोबत साजरे करत आहे.

दि. २२ जाने. ते २६ जाने. दरम्यान जिल्ह्यातील २० शाळांमध्ये प्रत्यक्ष जाऊन ७५ ध्वज ७५ विद्यार्थ्यांना वाटप केले जात आहेत. सोबत आपल्या संविधानाच्या प्रस्ताविकेचे मुलांसोबत सामूहिक वाचन व शपथ असा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये संविधान व प्रजासत्ताक दिनाबाबत माहितीपूर्ण जागरूकता निर्माण होण्यास मदत होईल.

सदरील उपक्रम म.न.पा. शाळा क्र. ६, लातूर, श्री पुरणमल लाहोटी पाठशाळा लातूर, म.न.पा. शाळा क्र. २८ लातूर, भगतसिंग विद्यालय आष्टा, जिल्हा परिषद विद्यालय आष्टा, शिवाजी विद्यालय आष्टा, रवीशंकर इंग्लिश स्कूल लातूर, रवीशंकर मराठी स्कूल लातूर, राजनंदा विद्यालय लातूर, व्यंकटेश विद्यालय लातूर, श्री. गोदावरीदेवी लाहोटी विद्यालय लातूर, स्टीम एज्युकेशन लातूर, नवभारत विद्यालय लातूर, अंकुर बालविकास केंद्र लातूर, जिल्हा परिषद नवीन चांडेश्वर, जिल्हा परिषद शाळा बोरी, जवाहर विद्यालय लातूर, इरा किड्स औसा, संस्काररत्न विद्यालय लातूर आणि ज्ञानेश्वर विद्यालय, लातूर इत्यादी शाळेत मोठ्या उत्सहात संपन्न झाले आहेत.

या उपक्रमासाठी शाखा अध्यक्षा सुमती बिडवे - सोमवंशी, उपाध्यक्षा हिरा वेदपाठक, उपाध्यक्षा सुवर्णा बुरांडे, कोषाध्यक्ष रवी अघाव , सहकार्यवाह रणजित आचार्य, कार्यकारिणी सदस्य वनिता गोजमगुंडे, रविकिरण सावंत, प्रिती ठाकूर, भिम दुनगावे, महेश पवार, महेश बिडवे, विशाल वाटवडे... सोबत मिनल अष्टेकर, महादेवी हिंगणे, इत्यादी पदाधिकाऱ्यानी जिल्ह्यात फिरून हा उपक्रम यशस्वी केला.

# लातूर जिल्ह्याच्या विकासासाठी सर्वांना सोबत घेवून काम करणार-पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

लातूर, दि. २५ : जिल्ह्याच्या विकासासाठी शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जाईल. यासाठी सर्वांना सोबत घेवून काम करणार असल्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले. लातूर शासकीय विश्रामगृह येथे त्यांचे आगमन झाल्यानंतर जिल्हा प्रशासन, पदाधिकारी, नागरिकांनी त्यांचे स्वागत केले. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता बी. एस. पांढरे, अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, तहसीलदार सौदागर तांदळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, पदाधिकारी, नागरिक यावेळी उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE